# पुणे विद्यापीठ

## शैक्षणिक प्रवेश विभाग

**परिपत्रक क्र.१८५ /२०११**

**विषय : नाटयाचार्य खाडीलकर पारितोषिक सन २०११–१२**

पीएच.डी. प्रबंधासाठी मराठी नाटक आणि रंगभूमी याविषयी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वरील पारितोषिकासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. पारितोषिकाची एकूण रक्कम रू. ५६००/– पुढीलप्रमाणे देण्यात येईल.

| | |
|---|---|
| संबंधित ग्रंथ खरेदीसाठी | रूपये ३७३३ /– |
| रोख रक्कम | रूपये १८६७ /– |

संशोधन कार्यास उपयुक्त ठरतील अशा ग्रंथांची खरेदी झाल्यावर सदर ग्रंथ कै. नाटयाचार्य खाडीलकर पारितोषिक निधीतून घेण्यात आले आहेत, अशी नोंद त्या खरेदी केलेल्या ग्रंथावर राहील. संशोधन कार्य संपताच किंवा कोणत्याही कारणाने संशोधन थांबविल्यास खरेदी केलेले ग्रंथ जयकर ग्रंथालयास परत करावयाचे आहेत.

१. अर्जासोबत अर्जदाराने २०० ते ३०० शब्दात आपल्या संशोधन विषयासंबंधीची रूपरेषा सादर करावी. तसेंच संशोधनासंबंधीचा अहवाल मार्गदर्शकाव्दारे विद्यापीठास पाठवावा.
२. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या संशोधनासंबंधी स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सादर करावा.

इच्छुक संशोधक विद्यार्थ्यांनी पारितोषिकासाठी अर्ज शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ पर्यंत पाठवावेत.

गणेशखिंड, पुणे ७
संदर्भ :शै. प्रवेश/ १८६९
दिनांक : ३१.१०.२०११

३१/१०/११
उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :–**

१. मा. विभागप्रमुख, कला व ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे – ७
२. मा. विभागप्रमुख, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे–७
"मराठी नाटक आणि रंगभूमी" या विषयातील मार्गदर्शक यांसी – हे परिपत्रक कृपया वरील विषयाच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावे.
३. मा. प्राचार्य, इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज इन मराठी, देवपूर, धूळे.